## सार्वजनिक आरोग्य विभाग

## 2.11 ट्रॉमा केअर सेंटरच्या स्थापनेवर निष्क्रीय खर्च

**वैजापूर, जिल्हा औरंगाबाद येथील ट्रॉमा केअर सेंटर गत सहा वर्षांपासून विद्युत पुरवठ्या अभावी कार्यरत नसल्यामुळे ₹ 1.66 कोटीचा खर्च निष्क्रीय झाला.**

अपघाती आघात हे भारतामधील मृत्यूचे प्रमुख कारण आहे. जर दुखापत झाल्याच्या एका तासाच्या (महत्त्वाचा तास) आंत जीवन रक्षक, प्रथमोपचार आणि द्रवाचे पुनरूत्थान[55] करण्याची व्यवस्था झाली तर बळी पडलेल्यांचे जीवन वाचविता येऊ शकते. उपरोक्त अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनाने 10 खाटांची[56] सुविधा असलेले स्तर-III[57] चे ट्रॉमा केअर सेंटर, राष्ट्रीय महामार्ग क्र.8 जवळ उपजिल्हा रूग्णालय, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद च्या आवारात स्थापन करायचे ठरविले (मार्च 2007).

सार्वजनिक बांधकाम मंडळ ह्यांनी प्रशासकीय मान्यता (ऑगस्ट 2010) आणि तांत्रिक मान्यता (मे 2011) ट्रॉमा केअर सेंटरच्या बांधकामासाठी प्रदान केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यादेश जारी केला (ऑगस्ट 2011) आणि ₹ 1.66 कोटी खर्चून काम पूर्ण केले आणि ट्रॉमा केअऱ सेंटर, उपजिल्हा रूग्णालय, वैजापूरला सुपूर्द केले (ऑगस्ट 2013).

उपजिल्हा रूग्णालय, वैजापूर च्या अभिलेख्यांची छाननी करताना लेखापरीक्षेस निदर्शनास आले (ऑगस्ट 2017) की ट्रॉमा केअर सेंटरचा ताबा घेतल्यानंतर, उद्वाहक आणि रक्त पेढी चालविण्याकरिता विना व्यत्यय विद्युत पुरवठ्याची निकड लक्षात घेऊन उपजिल्हा रूग्णालय ह्यांनी एक्सप्रेस फीडर लाईन कार्याकरिता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ला अंदाजपत्रक सादर करण्याची विनंती के ली (मे 2014). उपजिल्हा रूग्णालयाने ₹ 75 लाखाचे अंदाजपत्रक, जिल्हा रूग्णालय, औरंगाबादला सादर केले (मे 2014). परंतु जिल्हा रूग्णालय, औरंगाबाद यांनी फक्त ₹ 32 लाख निधीची विनंती आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई ला केली (सप्टेंबर 2014). उपजिल्हा रूग्णालय ह्यांनी पुनःश्च ₹ 77.22 लाख निधी देण्याची विनंती जिल्हा रूग्णालय, औरंगाबादला केली (जून 2015) आणि जिल्हा रूग्णालय, औरंगाबाद ह्यांनी विस्तृत अंदाजपत्रक सादर करण्यास उपजिल्हा रूग्णालय ह्यांना सांगितले (जून 2015). परंतु ते अद्ययाप सादर केले नाही. हे जिल्हा रूग्णालय, औरंगाबाद आणि उपजिल्हा रूग्णालय यामधील एक्सप्रेस फीडर लाईन संदर्भातील अंदाजपत्रकाबाबत स्पष्टतेचा अभाव दर्शविते.

---

55 द्रव बदलणे किंवा द्रव पुनरूत्थान हे घाम, रक्तस्राव, द्रव बदलणे किंवा इतर पॅथॉलॉजिक प्रक्रिये मार्फत गमावलेल्या शारीरिक द्रव परत भरून काढण्याची वैद्यकीय प्रक्रिया आहे.

56 पाच अतिदक्षता विभाग आणि पाच सामान्य ट्रॉमा बेड.

57 स्तर III ट्रॉमा केअर सेंटर प्रारंभिक मूल्यांकन प्रदान करेल आणि अपघातग्रस्तांना स्थिर करेल.

दरम्यान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ह्यांनी एक्सप्रेस फीडर/उच्च दाब जोडणी प्रदान करण्यासाठी नकार दिला (जून 2015) कारण उपजिल्हा रूग्णालय आणि ट्रॉमा केअर सेंटर एका आवारात स्थित होते आणि एका आवारात एका पेक्षा अधिक उच्च दाब जोडणी प्रदान करता येऊ शकत नव्हती. उपजिल्हा रूग्णालय ह्यांना भारवर्धनासाठी आवेदन करायला सांगण्यात आले आणि त्यानुसार उपजिल्हा रूग्णालय ह्यांनी आवेदन दिले (ऑगस्ट 2015). उपरोक्त भार वर्धनासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ह्यांनी ₹ 2.64 लाखाची तांत्रिक मान्यता प्रदान केली (डिसेंबर 2016). परंतु उपजिल्हा रूग्णालय ह्यांनी सदर रक्कम अजूनपावेतो भरली नसल्यामुळे काम होऊ शकले नाही.

ट्रॉमा केअर सेंटरसाठी मंजूर क्षमता 15 च्या विरूद्ध आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई ह्यांनी ऑगस्ट 2007 ते डिसेंबर 2008 दरम्यान डॉक्टर्स, नर्सेस इत्यादि मिळून आठ कर्मचाऱ्यांची नेमणूक केली होती. परंतु निष्क्रीय ट्रॉमा केअर सेंटरमुळे या कर्मचाऱ्यांना उपजिल्हा रूग्णालयाकडे वळती केले.

उपजिल्हा रूग्णालयाला वर्ष 2013 ते 2019 दरम्यान 521 अपघाती आणि 114 डोक्याच्या दुखापतीचे प्रकरण प्राप्त झाले होते परंतु ह्यांना ट्रॉमा केअर सेंटरच्या सुविधेचा फायदा प्राप्त होऊ शकला नाही.

उपरोक्त घटनेवरून स्पष्ट होते की महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने भारवर्धनासाठी मागणी केलेली रक्कम ₹ 2.64 लाखाची अदायगी करण्याचे प्रयत्न उपजिल्हा रूग्णालय अथवा जिल्हा रूग्णालय, औरंगाबाद ह्यांनी केले नाही. त्याऐवजी एक्सप्रेस फीडर लाईन प्रदान करण्यासंबंधात सतत पाठपुरावा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित सोबत केला की जे अगोदरच नाकारण्यात आले होते.

लेखापरीक्षेने निदर्शनास आणून दिल्यावर उपजिल्हा रूग्णालय ह्यांनी सांगितले की (मे 2019) एक्सप्रेस फीडर लाईन, वितरण व्यवस्था आणि विद्युत मीटरच्या अभावी ट्रॉमा केअर सेंटर कार्यरत नाही. उपजिल्हा रूग्णालय ह्यांनी एक्सप्रेस फीडर लाईन, वितरण व्यवस्था आणि विद्युत मोटरच्या स्थापनेकरिता विस्तृत अंदाजपत्रक सादर न केल्याचा ठपका, जिल्हा रूग्णालय, औरंगाबाद ह्यांनी, ठेवला.

अशाप्रकारे, शासनाचे विविध विभाग आणि अभिकरणांमध्ये स्पष्टता आणि समन्वयाचा अभाव असल्यामुळे इच्छित विद्युत पुरवठा ट्रॉमा केअर सेंटरला प्रदान केला नाही. परिणामतः ट्रॉमा केअर सेंटरच्या बांधकामावरील खर्च ₹ 1.16 कोटी निष्क्रीय झाला. शिवाय उद्देशित लाभापासून लाभार्थी गत सहा वर्षांपासून वंचित राहिले.

प्रकरण एप्रिल 2019 मध्ये शासनाकडे संदर्भित करण्यात आले; त्यांचे उत्तर जून 2020 अखेर प्रतिक्षित होते.